महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी
MSSDS
SKILLED YOUTH · EMPOWERED MAHARASHTRA
पहिला मजला ,एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग,
धोबी तलाव, मुंबई-४००००१
ई मेल: ceo@mssds.in दुरध्वनी क्र. ८६५५८१६२४०/४१

जा. क्र. MSSDS/MJPKVK/२०२६ -२७/६१४ दिनांक: २१/०८/२०२६

## शुद्धीपत्रक

**विषय:** महात्मा ज्योतिबा फुले कौशल्य प्रशिक्षण केंद्र योजनेबाबत प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदास (RFP) प्राप्त झालेल्या प्रतिसादाबाबत कार्यवाही करणे बाबत.

**संदर्भ:**

१ कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचा शासन निर्णय दि.६.०४.२०२६.

२ महात्मा ज्योतिबा फुले कौशल्य प्रशिक्षण केंद्र योजनेअंतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेली निविदा (RFP) दि.१२.०५.२०२६.

३ महात्मा ज्योतिबा फुले कौशल्य प्रशिक्षण केंद्र योजनेअंतर्गत पुनःप्रसिद्ध करण्यात आलेली निविदा (RFP) दि.३०.०७.२०२६.

प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता अभियान (PMKUVA) अंतर्गत किमान ३०० ते १५०० चौ.फुट जागेमध्ये "महात्मा ज्योतिबा फुले कौशल्य प्रशिक्षण केंद्र" सुरू करण्यास मान्यता देण्याबाबत कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत दि.०६.०४.२०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

त्यानुषंगाने, सदर योजनेअंतर्गत प्रकल्प अंमलबजावणी संस्थांची सूचीबद्धता/निवड करण्यासाठी या कार्यालया मार्फत महास्वयम पोर्टलवर दि.१२.०५.२०२६ रोजी निविदा (RFP) प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर RFP प्रक्रियेमध्ये निवड करण्यात आलेल्या पात्र निविदाकारांकडून नियमानुसार अपेक्षित प्रत्येकी २५ प्रशिक्षण केंद्रांचे उद्दिष्ट पूर्ण होऊ शकले नाही.तसेच, जास्तीत जास्त पात्र निविदाकारांना सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सदर RFP दि.३०.०७.२०२६ रोजी पुनःप्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर पुनःप्रसिद्ध निविदा (RFP) प्रक्रियेमध्ये, दि.१२.०५.२०२६ रोजीच्या प्रथम निविदा (RFP) प्रक्रियेत सहभागी होऊन निवड झालेल्या, परंतु नियमानुसार मंजूर २५ प्रशिक्षण केंद्रांची संख्या पूर्ण करू न शकलेल्या निविदाकारांनी पुन्हा सहभाग नोंदविला आहे. अशा निविदाकारांकडून पुनःप्रसिद्ध निविदा (RFP) प्रक्रियेमध्ये सहभागी होताना EMD (Earnest Money Deposit) रकमेमध्ये सूट देण्याची विनंती करण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने, दि.३०.०७.२०२६ रोजी पुनःप्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदा (RFP) च्या अनुषंगाने सहभागी होणाऱ्या व दि.१२.०५.२०२६ रोजीच्या प्रथम निविदा (RFP) प्रक्रियेत सहभागी होऊन निवड झालेल्या, परंतु नियमानुसार २५ प्रशिक्षण केंद्रांचे उद्दिष्ट पूर्ण करू न शकलेल्या निविदाकारांना लागू असलेल्या Earnest Money Deposit (EMD) रकमेच्या १०% (दहा टक्के) रक्कम रु. १०,०००/- (अक्षरी रु.दहा हजार) EMD म्हणून भरण्यात यावी.

(डॉ. अमित सैनी, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी